पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.
लेखा व वित्त विभाग,
मुंबई पुणे रोड ,पिंपरी, पुणे.

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in

---

क्र.लेखा/५०/कावि/३९/२०२२ दि.१२/०८/२०२२

## परिपत्रक

विषय – सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवानोंद पुस्तकाची पडताळणी करणे बाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध संवर्गातील अधिकारी / कर्मचारी म.न.पा. सेवेतुन नियत वयोमानानुसार, स्वेच्छा सेवानिवृत्त / मयत होत असतात. त्यांना निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन सुरू करणेकामी त्यांच्या सेवानोंद पुस्तकाची पडताळणी इकडील परिपत्रक क्र.लेखा/पेन्शन/३२/कावि/४०६२/२०१९ दिनांक ०२/०४/२०१९ अन्वये मुख्य लेखा परिक्षण विभागाकडून करून तसा दाखला घेऊन लेखा विभागात पेन्शन प्रकरण सादर करण्यात येत होते. तथापि मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. मुलेप/१अ/कावि/४९/२०२२ दिनांक : ०२/०४/२०२२ नुसार लेखा परिक्षण सुधारीत कार्य पध्दतीनुसार सेवानिवृत्तीचे प्रकरणी लेखा विभागामार्फत सेवानोंद पुस्तके पडताळणी करून संपूर्ण पेन्शन प्रकरण तयार करावे. तदनंतर मुख्य लेखा परिक्षण विभागाकडे लेखा परिक्षणाकामी सादर करावे असे आदेशीत केले आहे. तरी, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुखांना सुचित करण्यात येते, की यापुढे आपल्या विभागातून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवानोंद पुस्तके परिपूर्ण करून पडताळणी कामी सेवानिवृत्तीपूर्वी किमान ६ महिने अगोदर लेखा विभागाकडे सादर करावीत.

(जितेंद्र कोळंबे) १२/८
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी.

प्रत :- सर्व संबंधित विभाग.